


Subscribe इयत्ता – सातवी (27 जुलै) माझा अभ्यास Subscribe

# शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

## दिवस सत्तावीस : ☞






गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

कविता वाचा व समजून घ्या.    कविता तालासुरात म्हणा.

टेस्ट सोडवा

# ४. श्रावणमास

कविता पहा

• ऐका. वाचा. म्हणा.



श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे;
क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे.
वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे!
झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे,
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळे पिवळे ऊन पडे.
उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा.
बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि की एकमते.
फडफड करुनी भिजले अपुले पंख पाखरे सावरिती;
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती.
खिल्लारे ही चरती रानी, गोपहि गाणी गात फिरे,
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरे.
सुवर्णचंपक फुलला, विपिनी रम्य केवडा दरवळला,
पारिजातही बघता भामा, रोष मनीचा मावळला!
सुंदर परडी घेउनि हाती पुरोपकंठी शुद्धमती,
सुंदर बाला या फुलमाला, रम्य फुले-पत्री खुडती.
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयात,
वदनी त्यांच्या वाचुनि घ्यावे श्रावण महिन्याचे गीत!

**बालकवी**–त्र्यंबक बापूजी ठोमरे (१८९०-१९१८) : निसर्गकवी म्हणून प्रसिद्ध. बालवयातच कवितालेखनाला प्रारंभ. १९०७ साली जळगाव येथे भरलेल्या कविसंमेलनात 'बालकवी' म्हणून गौरवण्यात आले. 'बालकवींची कविता' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवीने श्रावण महिन्यातील निसर्गसृष्टीचे विलोभनीय व सुंदर वर्णन केले आहे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तालासुरांत व साभिनय म्हणून दाखवाव्यात. कवितांना योग्य चाली लावाव्यात. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरांत म्हणून घ्याव्यात.

मसावि व लसावि समजून घ्या.



टेस्ट सोडवा

3AC73A

# 3 मसावि–लसावि

**जरा आठवूया.**

- सर्वांत लहान मूळ संख्या (prime number) कोणती ?
- 1 ते 50 या संख्यांमध्ये किती मूळसंख्या आहेत ? त्यांची यादी करा.
- खालील संख्यांपैकी ज्या संख्या मूळसंख्या आहेत, त्या संख्यांभोवती वर्तुळ करा.

17, 15, 4, 3, 1, 2, 12, 23, 27, 35, 41, 43, 58, 51, 72, 79, 91, 97

**सहमूळ संख्या** (coprime numbers) : ज्या दोन संख्यांचा सामाईक विभाजक फक्त 1 हाच असतो, त्या संख्या एकमेकींच्या **सहमूळ संख्या** आहेत असे म्हणतात. सहमूळ संख्यांना **सापेक्ष मूळ संख्या** (relatively prime numbers) असेही म्हणतात.

जसे : 10 व 21 या संख्या सहमूळ संख्या आहेत. कारण 10 चे विभाजक : 1, 2, 5, 10 आणि 21 चे विभाजक 1, 3, 7, 21. या दोनही संख्यांच्या विभाजकांमध्ये 1 हा एकमेव सामाईक विभाजक आहे. (3, 8) ; (4, 9); (21, 22) ; (22, 23) ; (23, 24) या काही सहमूळ संख्या आहेत. दोन क्रमवार संख्या सहमूळ असतात याचा पडताळा घ्या.

**जाणून घेऊया.**

## जोडमूळ संख्या (Twin prime numbers)

ज्या दोन मूळ संख्यांतील फरक 2 आहे, त्या दोन मूळ संख्यांना जोडमूळ संख्या असे म्हणतात.

जसे : (3, 5) ; (5, 7) ; (11, 13) ; (29, 31) इत्यादी.

## सरावसंच 10

1. जी संख्या मूळ नाही आणि संयुक्तही नाही, अशी संख्या कोणती आहे ?
2. पुढील जोड्यांपैकी सहमूळ संख्यांच्या जोड्या ओळखा.
   (i) 8, 14 (ii) 4, 5 (iii) 17, 19 (iv) 27, 15
3. 25 ते 100 पर्यंतच्या सर्व मूळ संख्यांची यादी करा. त्या किती आहेत ते लिहा.
4. 51 ते 100 पर्यंतच्या सर्व जोडमूळ संख्या लिहा.
5. 1 ते 50 मधील सहमूळ संख्यांच्या 5 जोड्या लिहा.
6. मूळ संख्यांपैकी समसंख्या कोणत्या ?

**जाणून घेऊया.**

## संख्येचे मूळ अवयव पाडणे (Prime factorisation of a number)

संख्यांचा लसावि व मसावि काढण्यासाठी युक्लिडचा एक सोपा व महत्त्वाचा नियम अनेकदा वापरला जातो. **"कोणतीही संयुक्त संख्या ही मूळ संख्यांच्या गुणाकाराच्या रूपात लिहिता येते"** हा तो नियम आहे.

Understand the HCF and LCM.

टेस्ट सोडवा

YHYJ48

# 3 HCF and LCM

**Let's recall.**

- Which is the smallest prime number?
- List the prime numbers from 1 to 50. How many are they?
- Circle the prime numbers in the list below.

17, 15, 4, 3, 1, 2, 12, 23, 27, 35, 41, 43, 58, 51, 72, 79, 91, 97

**Co-prime numbers :** Two numbers which have only 1 as a common factor are said to be **co-prime** or **relatively prime** or **mutually prime numbers**.

For example, 10 and 21 are co-primes, because the divisors of 10 are 1, 2, 5, 10 while the divisions of 21 are 1, 3, 7, 21 and the only factor common to both 10 and 21 is 1.

Some other co-prime numbers are (3, 8) ; (4, 9); (21, 22) ; (22, 23) ; (23, 24).

Verify that any two consecutive natural numbers are co-primes.

**Let's learn.** Twin Prime Numbers

If the difference between two co-prime numbers is 2, the numbers are said to be twin prime numbers.

For example : (3, 5) ; (5, 7) ; (11, 13) ; (29, 31) etc.

## Practice Set 10

1. Which number is neither a prime number nor a composite number?
2. Which of the following are pairs of co-primes?


   (i) 8, 14 (ii) 4, 5 (iii) 17, 19 (iv) 27, 15
3. List the prime numbers from 25 to 100 and say how many they are.
4. Write all the twin prime numbers from 51 to 100.
5. Write 5 pairs of twin prime numbers from 1 to 50.
6. Which are the even prime numbers?

**Let's learn.** Factorising a Number into its Prime Factors

A simple but important rule given by Euclid is often used to find the GCD or HCF and LCM of numbers. The rule says that **any composite number can be written as the product of prime numbers**.

टेस्ट सोडवा

## Read and understand.



One word brought back another, and the women began to quarrel. The men, too, ran out, and a big crowd gathered in the street. All were crying, and nobody could hear his neighbour. They scolded and cursed each other; one man gave another man a push, and a fight had begun, when Akulka's grandmother came out. She stepped in the midst of the peasants, and began to talk to them:

"What are you doing, dear ones? Consider the holiday. This is a time for rejoicing. And see what sin you are doing!"

They paid no attention to the old woman, and almost knocked her off her feet. She would never have stopped them, if it had not been for Akulka and Malasha.

While the women exchanged words, Akulka wiped off her dress, and went back to the puddle in the lane. She picked up a pebble and began to scratch the ground so as to let the water off into the street. While she was scratching, Malasha came up and began to help her. She picked up a chip and widened the rill.

**Guess the meaning of :**

- 'One word brought back another.'

**In what sense are the words used here?**

- crying
- holiday
- knocked her off her feet

**Listen and answer :**

- Did the people stop fighting?
- What did Akulka do?
- What did Malasha do?
- What was the old woman trying to do?

वाचा समजून घ्या.

## ३. धार्मिक समन्वय

सराव

टेस्ट सोडवा

भक्तिरचना केल्या. त्यांची भक्तिगीते भक्ती, सहिष्णुता व मानवता यांचा संदेश देणारी आहेत. संत रोहिदास हे एक महान संत होते. त्यांनी समतेचा व मानवतेचा संदेश दिला. संत सेना हे एक प्रभावी संत होऊन गेले. हिंदी साहित्यातील महाकवी सूरदास यांनी 'सूरसागर' हे काव्य लिहिले. कृष्णभक्ती हा त्यांच्या काव्याचा विषय आहे. मुस्लिम संत रसखान यांनी लिहिलेली कृष्णभक्तीची गीते रसाळ आहेत. संत तुलसीदासांच्या 'रामचरितमानस' या ग्रंथात रामभक्तीचा सुंदर आविष्कार झालेला आढळतो.

कर्नाटकात बसवेश्वरांनी लिंगायत विचारधारेचा प्रसार केला. त्यांनी जातिभेदाला विरोध केला. श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व सांगितले. त्यांचे 'कायकवे कैलास' हे प्रसिद्ध वचन आहे. त्याचा अर्थ श्रम हाच कैलास होय, असा आहे. आपल्या चळवळीमध्ये स्त्रियांनाही सहभागी करून घेतले. 'अनुभवमंटप' या सभागृहामध्ये होणाऱ्या धर्मचर्चेत सर्व जातींचे स्त्री-पुरुष सहभागी होऊ लागले. त्यांनी आपली शिकवण कन्नड या लोकभाषेमध्ये वचनसाहित्याच्या माध्यमातून दिली. त्यांच्या कार्याचा समाजावर मोठा परिणाम झाला. बसवेश्वरांच्या अनुयायांनी मराठी भाषेतही रचना केल्या आहेत. त्यांपैकी मन्मथ स्वामी यांनी लिहिलेला 'परमरहस्य' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. कर्नाटकमध्ये पंप, पुरंदरदास इत्यादी थोर संत होऊन गेले. त्यांनी कन्नड भाषेत अनेक भक्तिकवने रचली.



श्री बसवेश्वर

**महानुभाव पंथ :** तेराव्या शतकात चक्रधरस्वामींनी महाराष्ट्रात 'महानुभाव' पंथ प्रवर्तित केला. हा कृष्णभक्तीचा उपदेश करणारा पंथ आहे. श्रीगोविंदप्रभू हे चक्रधर स्वामींचे गुरू होते. चक्रधरांच्या शिष्यांमध्ये सर्व जाती-जमातींमधील स्त्री-पुरुषांचा समावेश होता. ते समतेचे पुरस्कर्ते होते. त्यांनी महाराष्ट्रभर भ्रमंती करत मराठीतून उपदेश केला. संस्कृतऐवजी मराठी भाषेला प्राधान्य दिले. त्यामुळे मराठी भाषेचा विकास झाला. मराठी भाषेमध्ये विपुल ग्रंथनिर्मिती झाली.



चक्रधरस्वामी

या पंथाचा प्रसार महाराष्ट्रात प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाडा या भागांत झाला. विदर्भातील ऋद्धिपूर हे या पंथाचे महत्त्वाचे स्थान होय. तसेच हा पंथ पंजाब, अफगाणिस्तान अशा दूरवरच्या प्रदेशापर्यंत पोहचला होता.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महानुभाव पंथाच्या अनुयायांनी केलेल्या काही प्रमुख रचना पुढीलप्रमाणे : म्हाइंभट यांनी संपादित केलेला चक्रधरांच्या लीळांचे वर्णन करणारा 'लीळाचरित्र' हा ग्रंथ, आद्य मराठी कवयित्री महदंबा यांचे 'धवळे', केशोबास यांनी संपादित केलेले 'सूत्रपाठ आणि दृष्टान्तपाठ', दामोदर पंडितांचे 'वच्छाहरण', भास्करभट्ट बोरीकर यांचा 'शिशुपालवध', नरेंद्रांचे 'रुक्मिणीस्वयंवर'.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

महाराष्ट्रात संत एकनाथांनी लिहिलेला हिंदू व मुसलमान यांच्यातील संवाद धार्मिक समन्वयाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. संत शेख महंमद यांचे '*शेख महंमद अविंध । त्याचे हृदयी गोविंद ।।*' हे प्रसिद्ध वचन या समन्वयाचे एक उदाहरण होय.


**गुरुनानक :** गुरुनानक हे शीख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरू होत. धार्मिक समन्वयाचा एक मोठा प्रयत्न म्हणून त्यांच्या कार्याचा उल्लेख करावा

## ३. भरती–ओहोटी

टेस्ट सोडवा

### वाचा व समजून घ्या.

- पृथ्वीचे सूर्याभोवती फिरणे व चंद्राचे अप्रत्यक्षपणे सूर्याभोवती फिरणे.
- परिवलनामुळे पृथ्वीवर निर्माण होणारी केंद्रोत्सारी प्रेरणा.




आकृती ३.६ : भरती–ओहोटी निर्मिती प्रक्रिया

सूर्यापेक्षा चंद्र पृथ्वीच्या अधिक जवळ आहे, त्यामुळे पृथ्वीवर चंद्राचे गुरुत्वाकर्षण बल सूर्याच्या गुरुत्वाकर्षण बलापेक्षा जास्त परिणाम करते. चंद्र, सूर्य व पृथ्वी यांच्या सापेक्ष स्थितीमुळे भरती–ओहोटी होत असते. पृथ्वीवर ज्या ठिकाणी भरती किंवा ओहोटी येते. त्याच्या विरुद्ध ठिकाणीही त्याच वेळी अनुक्रमे भरती किंवा ओहोटी येते हा पृथ्वीच्या केंद्रोत्सारी बलाचा परिणाम आहे. आकृती ३.६ प्रमाणे पृथ्वीवरील भरती–ओहोटीच्या स्थिती लक्षात घ्या.

- ज्या वेळेस ०° रेखावृत्तावर भरती असते, त्या वेळेस त्याच्या विरुद्ध बाजूला असलेल्या १८०° रेखावृत्तावरही भरती असते.
- त्याचवेळी या रेखावृत्तांना काटकोन स्थितीत ओहोटी असते. जर भरती ०° व १८०° रेखावृत्तांवर असेल, तर ओहोटी कोणकोणत्या रेखावृत्तांवर असेल?


**जरा विचार करा !**

☞ पृथ्वीपासून दूर अवकाशात जाण्यासाठी मोठे अग्निबाण वापरावे लागतात. ते कोणत्या बलाच्या विरोधात कार्य करतात.

### भरती–ओहोटीचे प्रकार :

ज्याप्रमाणे रोजच्या रोज भरतीच्या वेळा बदलतात, त्याचप्रमाणे भरतीची कक्षादेखील कमी–अधिक होत असते. सर्वसाधारणपणे अमावास्येला व पौर्णिमेला ती सर्वांत मोठी असते, तर अष्टमीच्या दिवशी ती नेहमीपेक्षा लहान असते.या भरती–ओहोटीचे अनुक्रमे उधाणाची व भांगाची असे दोन मुख्य प्रकार आहेत.

**उधाणाची भरती–ओहोटी *(Spring Tide)* :** चंद्र व सूर्य यांच्या भरती निर्माण करणाऱ्या प्रेरणा अमावास्या व पौर्णिमेला एकाच दिशेत कार्य करतात, त्यामुळे गुरुत्वाकर्षण बल वाढते; आणि त्या दिवशी उधाणाची भरती येते, जी सरासरीपेक्षा फारच मोठी असते. आकृती ३.७ पहा. भरतीच्या ठिकाणी पाण्याचा अधिक फुगवटा झाल्यामुळे ओहोटीच्या ठिकाणी पाणी अधिक खोलपर्यंत ओसरते. ही उधाणाची ओहोटी असते.




आकृती ३.७ : उधाणाची भरती–ओहोटी

**भांगाची भरती–ओहोटी *(Neap Tide)* :** चंद्र पृथ्वीभोवती फिरताना महिन्यातून दोन वेळा तो पृथ्वी व सूर्याच्या संदर्भात काटकोन स्थितीत येतो. ही स्थिती प्रत्येक महिन्याच्या शुक्ल व कृष्ण पक्षातील अष्टमीला येते. या दोन दिवशी भरती निर्माण करणाऱ्या चंद्र आणि सूर्य यांच्या प्रेरणा पृथ्वीवर काटकोन दिशेत कार्य करतात. (आकृती ३.८ पहा.) सूर्यामुळे ज्याठिकाणी भरती निर्माण होते तेथील पाण्यावर काटकोनात असलेल्या चंद्राच्या गुरूत्वाकर्षण बलाचाही परिणाम दिसून येतो. त्यामुळे निर्माण झालेल्या भरतीच्या पाण्याची पातळी

पाठ वाचा व समजून घ्या.

## 2. वनस्पती : रचना व कार्ये

टेस्ट सोडवा

सराव

### फळ (Fruit)

आपण दैनंदिन जीवनात वेगवेगळी फळे वापरतो. प्रत्येक फळ हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचा आकार, रंग, चव यांमध्ये विविधता आढळून येते. आंब्यात एकच कोय असते, तर फणसात असंख्य गरे व बिया असतात.

बोर, आंबा, चिकू, सफरचंद अशा फळांची निरीक्षणे करा. काय दिसते ? त्यांमध्ये कवचाची, गराची व बियांची रचना, संख्या वेगवेगळी असते. काजूसारख्या काही फळांमध्ये बी थोडेसे बाहेरच्या बाजूस आलेले असते.


शेंगदाणे, वाटाणा, गहू, ज्वारी या बिया तीन ते चार तास पाण्यात भिजवा. चिमटीने बी दाबा. कोणत्या बी चे दोन समान भाग होतात ते पहा. ज्याचे दोन समान भाग होतात त्यांना **द्विदल बी** (Dicotyledons) म्हणतात, तर ज्यांचे दोन समान भाग होत नाहीत त्यांना **एकदल बी** (Monocotyledons) म्हणतात.



2.11 विविध फळे व बिया

### स्वाध्याय

1. वनस्पतींची तीन उदाहरणे द्या.
   - अ. काटेरी आवरणाची फळे असणाऱ्या –
   - आ. खोडावर काटे असणाऱ्या –
   - इ. लाल फुले असणाऱ्या –
   - ई. पिवळी फुले असणाऱ्या –
   - उ. रात्री पाने मिटणाऱ्या –
   - ऊ. एकच बी असणारी फळे असणाऱ्या –
   - ए. फळामध्ये अनेक बिया असणाऱ्या –
2. कोणत्याही एका फुलाचे निरीक्षण करा. त्याचे विविध भाग अभ्यासा व त्याचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहून आकृती काढा.
3. काय सारखे ? काय वेगळे ?
   - अ. ज्वारी आणि मूग
   - आ. कांदा आणि कोथिंबीर
   - इ. केळीचे पान व आंब्याचे पान
   - ई. नारळाचे झाड व ज्वारीचे ताट
4. खालील चित्रांविषयीचे स्पष्टीकरण तुमच्या शब्दांत लिहा.




EBHBPI

5. वनस्पतींच्या अवयवांची कार्ये स्पष्ट करा.
6. खाली पानांचे काही गुणधर्म दिलेले आहेत. प्रत्येक गुणधर्माचे एक पान शोधून वनस्पतीचे वर्णन लिहा. गुळगुळीत पृष्ठभाग, खडबडीत पृष्ठभाग, मांसल पर्णपत्र, पर्णपत्रावर काटे.
7. तुम्ही अभ्यासलेल्या वनस्पतींच्या विविध भागांची नावे खालील चौकटीत शोधा.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | सो | ट | मू | ळ | फू | मू | बी |
| बा | कु | शी | कु | ल | ल | ळ | जां |
| क्षी | पे | र | ल | खो | रो | फ | ड |
| अं | डा | श | य | ग्र | ड | म | द |
| जा | दे | ठ | र्णा | ए | क | द | ल |
| पा | यां | प | र्ण | त | ल | कां | पुं |
| पु | मं | ग | पा | क | ळी | डे | ज |

**उपक्रम :** संगणकावर पेंटब्रशच्या साहाय्याने विविध पानांची चित्रे काढा व तुमच्या नावाने फोल्डर मध्ये सेव्ह करा.

◆ ◆ ◆

## Fruit

Read and understand. Revision

We eat many different types of fruits. Each type of fruit has its own characteristics. There are variations in their shape, colour, taste, etc. Mango contains only one seed where as jackfruit consists of many small fruitlets, each with its own seed.

Observe the fruits of *ber* (ziziphus), mango, chikoo, apple, etc. What do you observe? Each fruit has a different skin or shell, fleshy part and seed. In case of fruits like cashew, its seed is outside the fruit.

Soak the seeds of, pea, wheat, rice, jowar, groundnut in water for 3-4 hrs. Press the seeds with your fingers and observe them. Which seeds get divided into two equal parts? Seeds which get divided into two equal parts are called dicotyledonous seeds. Seeds which do not divide into two equal parts are called monocotyledonous seeds.



**2.11 Various fruits and seeds**


## Exercise

**1. Give examples of 3 plants that have :**
(a) spiny fruits
(b) spiny stem
(c) red flowers
(d) yellow flowers
(e) leaves which close at night
(f) single-seeded fruits
(g) many-seeded fruits

**2. Observe any one flower and its various parts and describe it in your own words.**

**3. What are the similarities and differences between ?**
(a) jowar and moong
(b) onion and coriander
(c) leaves of banana and mango
(d) coconut tree and jowar stalk plant

**4. Explain the following images in your own words.**




**5. Describe the functions of various parts of a plant.**

**6. Certain properties are mentioned below. Find a leaf corresponding to each property and describe those plants.**
leaves with smooth surface, leaves with rough surface, fleshy leaf, spines on leaf.

**7. Find the plant parts.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| r | b | u | d | x | s | r | f |
| o | w | p | y | e | t | a | l |
| o | l | l | d | n | e | d | o |
| t | a | o | i | l | m | i | w |
| c | n | e | t | a | l | c | e |
| a | v | o | v | u | m | l | r |
| p | e | t | a | l | s | e | o |
| r | o | o | t | h | a | i | r |

**Activity :** Sketch various types of leaves in Paintbrush on the computer and save the sketches in a folder of your own name.

♦ ♦ ♦

● सुनो, पढ़ो और लिखो :

रियाज

# ४. देहात और शहर

– *अभिषेक पांडेय*

**जन्म :** २९ जनवरी १९९२, मुंबई (महाराष्ट्र) **परिचय :** सम-सामयिक विषयों में अभिषेक पांडेय जी की विशेष अभिरुचि एवं लेखन रहा है। प्रस्तुत पत्रों में लेखक ने देहात और शहर के अपने सुख-दुख एवं बढ़ती हुई जनसंख्या के अभिशाप पर अनेक सुझाव दिए हैं।



**खोजबीन**

डाकघर से प्राप्त सेवाएँ बताओ और संकेत स्थलों से अन्य सेवाएँ ढूँढ़कर उनकी सूची बनाओ।

सेवाओं के नाम | कब ली जाती हैं ?

टेस्ट सोडवा




दिनांक १ अगस्त, २०१७

प्रिय मित्र शहर,

नमस्कार।

कल तुमसे बात हुई। मेरे सुख-दुख के संबंध में पूछा। धन्यवाद ! बहुत सारी बातें मन में हैं, सब कुछ दूरध्वनि पर कहना मुश्किल है। सोचा; पत्र ही लिखूँ। अब मैं अपना दुखड़ा क्या रोऊँ? चलिए, इस बार कुछ अच्छी बातें भी तुमसे साझा करता हूँ। 'डिजिटल' क्रांति का थोड़ा असर हमारे गाँव में भी दिखाई पड़ने लगा है। 'मोबाइल' के माध्यम से नित नवीन सूचनाएँ हम तक पहुँचने लगी हैं। 'स्वच्छ ग्राम-स्वस्थ ग्राम' परियोजना घर-घर तक पहुँच गई है। ग्रामजन भी शिक्षा, स्वास्थ्य, रोजगार, खेती के नवीन औजारों और आधुनिक खेती की पद्धतियों को थोड़ा-थोड़ा जानने लगे हैं। 'घर-घर में शौचालय' जैसी सुविधा के प्रति लोग जागरूक हो रहे हैं।

हालाँकि कुछ परेशानियाँ अब भी वहीं की वहीं हैं। पीने का पानी लाने के लिए दूर-दूर तक जाना पड़ता है। मेरे यहाँ विद्यालय तो हैं पर उनमें आवश्यक सुविधाएँ नहीं हैं। महाविद्यालय तो हमारे गाँव से बहुत दूर है। तुम्हारे बारे में सोचता हूँ तो लगता है कि तुम्हारे पास अत्याधुनिक और अच्छी सुविधाएँ, विकसित तकनीक हैं। तुम्हारी दिन दूनी-रात चौगुनी उन्नति हो रही है। तुम कितने सुखी हो ! यातायात के आधुनिक साधन, पक्की चौड़ी सड़कें, बड़े-बड़े शॉपिंग मॉल और चौबीस घंटे बिजली की सुविधा तुम्हारी शान में चार चाँद लगा देती हैं। कभी-कभी मन बहुत उदास हो जाता है। एक जमाना था, जब मेरे यहाँ बहुत खुशहाली थी। चारों तरफ हरियाली थी पर अब पहले जैसी रौनक नहीं रही। मैं असुविधा, बेरोजगारी, आपसी झगड़े, गुटबाजी, अशांति जैसी समस्याओं से घिरता



❑ पत्र का मुखर वाचन कराएँ। प्रश्नोत्तर के माध्यम से इन पत्रों के मुख्य मुद्दों पर चर्चा कराएँ। देखे हुए देहात-शहर में क्या-क्या अंतर होता है, बताने के लिए प्रेरित करें। आदर्श गाँव/शहर में क्या-क्या होना चाहिए, पूछें। बढ़ती जनसंख्या की समस्या पर चर्चा करें।

# माझा ऑनलाईन अभ्यास

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| सातवी मराठी | सातवी गणित | सेमी गणित | सातवी इंग्रजी | सातवी इतिहास |
|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सातवी भूगोल | सातवी विज्ञान | सेमी विज्ञान | सातवी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे
वेब स्त्रोत-'ई-बालभारती'
सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in